महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : १५५ वे | दिनांक : ३०/०५/२०२६ | वार : शनिवार

## मराठा आरक्षणावर समाधानकारक काम : राधाकृष्ण विखे पाटील यांचा दावा



**छत्रपती संभाजीनगर :** राज्याचे जलसंपदा मंत्री तथा मराठा उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांनी आज मराठा आरक्षणाच्या मुद्यावर समाधानकारक काम झाल्याचा दावा केला. मराठा आरक्षणाच्या बाबतीत मिसिंग लिंक शोधण्याच्या बाबतीत अनेक ठिकाणी समाधानकारक काम केले आहे. पण या प्रकरणी जिल्हाधिकाऱ्यांनी प्रत्येक तालुक्याला जाऊन सॅम्पल केसेसचा आढावा घेतला पाहिजे. वस्तुस्थिती काय आहे? हे समजून घेतले पाहिजे. ग्राऊंड रिपोर्ट काय सांगतो व आपल्याला येणारा अहवाल काय सांगतो हे पाहिले पाहिजे, असे ते म्हणालेत.

छत्रपती संभाजीनगर येथे आज मराठा समन्वय समितीची बैठक झाली. या बैठकीला मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यासह भाजप आमदार प्रसाद लाड उपस्थित होते. या बैठकीनंतर बोलताना विखे पाटील म्हणाले, आज आम्ही मराठा आरक्षणाचा विस्ताराने आढावा घेतला. या प्रकरणी मुख्य प्रश्न जात प्रमाणपत्र देण्याचा आहे. या प्रकरणी आतापर्यंत काही कारवाई झाली. त्यात जवळपास ३ लाख जात प्रमाणपत्रांची पडताळणी करून देण्यात आली आहे. यापुढेही जसे अर्ज येतील, तशी कारवाई होईल. या प्रकरणी कन्नडचे एक उदाहरण होते. या प्रकरणात समितीने प्रस्ताव मान्य केला होता.


पण अधिकारी पातळीवर तो रद्द झाला. नंतर संबंधित लोकांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे अपिल केले. जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांचे अपिल मान्य करत तहसीलदारांचा निर्णय कायम केला. त्यानंतर पुन्हा संबंधित अर्ज अधिकाऱ्यांकडे पाठवण्यात आला. हा अर्ज ऑक्टोबर २०२५ ला त्यांच्याकडे गेला. पण संबंधितांना त्यावर कारवाई करण्यासाठी अजून वेळ मिळाला नाही. हे प्रकरण गंभीर होते. अशा निष्क्रियतेमुळे किंवा नाकर्तेपणामुळे जनमाणसाचा आक्रोश वाढतो. मग ती सर्व जबाबदारी शासनाला घ्यावी लागते. मी आता विभागीय आयुक्तांना संबंधितांवर कारवाई करण्याच्या सूचना केल्या आहेत.

अशा पद्धतीने किमान पुढच्या काही दिवसांत संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी प्रत्येक तालुक्याला जाऊन सॅम्पल केसेसचा आढावा घेतला पाहिजे. वस्तुस्थिती काय आहे? हे समजून घेतले पाहिजे. ग्राऊंड रिपोर्ट काय सांगतो किंवा आपल्याला येणारा अहवाल काय सांगतो हे पाहिले पाहिजे. कुठे काही विसंगती आढळत असतील आणि त्याचा विनाकारण नागरिकांना त्रास होत असेल तर त्या मिसिंग लिंक शोधण्याची गरज आहे. या प्रकरणी अनेक ठिकाणी समाधानकारक काम झाले आहे, असे विखे पाटील म्हणाले.

ते पुढे म्हणाले, मी या प्रकरणी सातत्याने आढावा घेत आहे. या प्रकरणी एक नवीन एसओपी तयार केली आहे. या एसओपीद्वारे या सर्वच मिसिंग लिंक दुरुस्त होतील. या प्रकरणी लोकं अर्जच करत नाहीत, तर प्रमाणपत्र कसे देणार? असा प्रश्न उपस्थित केला जातो. वास्तविक मी या गोष्टीवर सहमत नाही. यासंबंधी समिती स्थापन झाली, तेव्हा त्रिसदस्यीय समिती स्थापन केली. तसेच गावोगावी दवंड्या देण्याच्या, लोकांपर्यंत पोहोचण्याच्या व ग्रामसभा घेण्याच्या सूचना देण्यात आल्या. या प्रकरणी त्रिसदस्यीय समितीला अधिक प्रभावीपणे कसे काम करता येईल हे पाहावे लागेल. काही जिल्ह्यांतील गावे निरंकच दिसतात. विशेषतः ज्या जिल्ह्यांत आंदोलनाची तीव्रता जास्त होती, त्याच जिल्ह्यांतून अर्ज येत नाहीत हे न पटण्यासारखे आहे, असे विखे म्हणाले.

विखे पाटलांनी यावेळी मागील ५-६ महिन्यांत मराठा समाजाला तब्बल ६१ हजार दाखले जारी केल्याचेही सांगितले. ते म्हणाले, सरकारने समिती गठीत होण्यापूर्वी साधारण अडीच लाख दाखले दिले होते. त्यानंतर समिती स्थापन झाल्यानंतर मागील ५-६ महिन्यांत तब्बल ६१ हजार दाखले देण्यात आले. काही ठिकाणी वंशावळी किंवा लोकांमधील गैरसमजामुळे अर्ज येत नाहीत. त्याठिकाणी एक व्यापक मोहीम हाती घेतली जात आहे. या प्रकरणी ज्या जुन्या काही लिपी आहेत, त्यावर ज्या नोंदी आहेत. पण हैदराबाद गॅझेटमध्ये केवळ नंबर आहेत. याऊलट पश्चिम महाराष्ट्र व अन्य ठिकाणी नावाने नोंदी आहेत. आपण नंबरवरून वंशावळ निश्चित करण्यास सांगितले आहे. पण या प्रकरणी विशेष अभियान राबवले तर त्यातून मार्ग निघेल, असे विखे पाटील म्हणाले.

## हवाई दल राष्ट्रीय सुरक्षेसाठी, भाजपच्या नाकर्तेपणाची भरपाई करण्यासाठी नव्हे - आंबेडकर



**मुंबई :** वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी महत्त्वाच्या असणाऱ्या नीट परीक्षेसाठी हवाई दलाचा वापर करण्यास कडाडून विरोध केला आहे. भारतीय हवाई दल हे देशाच्या राष्ट्रीय सुरक्षेसाठी अस्तित्वात आहे, ते भाजपचा नाकर्तेपणा व शिक्षण मंत्रालयातील खोलवर रुजलेल्या भ्रष्टाचाराची भरपाई करण्यासाठी नव्हे, असे त्यांनी म्हटले आहे.


केंद्र सरकारने नीट पेपरफुटी रोखण्यासाठी आता थेट हवाई दलाची मदत घेण्याच्या मुद्यावर गांभिर्याने विचार सुरू केला आहे. यासंबंधीच्या प्रस्तावानुसार, हवाई दलाच्या विमानांचा व त्यांच्या कडक सुरक्षा प्रोटोकॉलचा वापर करून नीट परीक्षेच्या प्रश्नपत्रिका थेट व सुरक्षितपणे वितरित केल्या जाणार आहेत. यामुळे कोणत्याही प्रकारच्या गैरव्यवहाराला जागा उरणार नाही. या प्रस्तावावर अंतिम निर्णय पीएमओच्या मंजुरीनंतर घेतला जाईल. या सर्व प्रक्रियेवर स्वतः पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची नजर आहे. या पार्श्वभूमीवर वंचितच्या प्रकाश आंबेडकर यांनी या निर्णयावर निशाणा साधला आहे.

प्रकाश आंबेडकर या प्रकरणीची एक बातमी पोस्ट करताना म्हणाले की, हा कसला मूर्खपणा आहे? खरोखरच, हा निव्वळ हास्यास्पद प्रकार आहे. 'NEET' परीक्षेच्या प्रश्नपत्रिकांची वाहतूक करण्यासाठी हवाई दलाची मदत घ्यावी लागत असेल, तर हे काही भक्कम सुरक्षेचे लक्षण नव्हे; उलट, ही पूर्णपणे कोलमडलेल्या परीक्षा पद्धतीचा जिवंत पुरावा आहे. 'NEET' पेपरफुटी केवळ प्रश्नपत्रिकांची वाहतूक करणारे ट्रक असुरक्षित आहेत म्हणून होत नाही. तर, या गळतीचे मूळ व्यवस्थेतील खोलवर रुजलेल्या भ्रष्टाचारात आहे. यात व्यवस्थेतीलच काही लोक सामील आहेत. प्रशासन व संपूर्ण व्यवस्थेमध्येच उत्तरदायित्वाचा (accountability) पूर्ण अभाव आहे, म्हणूनच ही पेपरफुटी होत आहे.

'NEET' परीक्षेच्या व्यवस्थापनासाठी हवाई दलाचा वापर करणे हा केवळ मूळ समस्येवरून लक्ष विचलित करण्यासाठी रचलेला एक देखावा आहे. भाजपचे निष्ठावान समर्थक आणि काही विशिष्ट पत्रकार या मूर्खपणाचे किती उत्साहाने समर्थन करतील, याची मी सहज कल्पना करू शकतो. भारतीय हवाई दलाचे अस्तित्व हे देशाच्या सुरक्षेचे रक्षण करण्यासाठी आहे. भाजपचा नाकर्तेपणा आणि शिक्षण मंत्रालयाला ग्रासून टाकणाऱ्या खोलवर रुजलेल्या भ्रष्टाचाराची उणीव भरून काढण्यासाठी नव्हे.

धर्मेंद्र प्रधान यांना याची लाज वाटली पाहिजे. २३ लाख विद्यार्थ्यांचे भविष्य आणि करिअर धोक्यात घातल्यानंतर राजीनामा देण्याऐवजी, ते जनतेचे लक्ष मूळ समस्येवरून हटवण्यासाठी केवळ अशा मूर्खपणाच्या कृत्यांमध्ये मग्न आहेत, असे प्रकाश आंबेडकर यांनी केंद्र सरकारचे कान टोचताना म्हटले आहे.

## 'स्मार्ट मीटर' लावण्यासाठी महावितरणची नवी खेळी:मीटर स्लो किंवा नादुरुस्त ठरवून ग्राहकांवर दबाव; महाराष्ट्र वीज ग्राहक संघटनेचा आरोप



**मुंबई :** वीज वितरण कंपनीने गत काही महिन्यांपासून साध्या मीटरच्या जागी स्मार्ट मीटर लावण्याचा सपाटा सुरू केला आहे. या प्रकरणी अनेक ग्राहकांना त्यांच्या वीज वापरात कोणताही मोठा बदल नसताना त्यांचे मीटर तपासण्यासाठी पथके पाठवली जात आहेत. विशेषतः मीटर स्लो किंवा नादुरुस्त ठरवून या प्रकरणी ग्राहकांवर स्मार्ट मीटर बसवण्याचा दबाव टाकला जात असल्याचा आरोप महाराष्ट्र वीज ग्राहक संघटनेने केला आहे.

राज्यात सध्या साध्या मीटरच्या जागी स्मार्ट मीटर लावण्याची मोहीम राबवली जात आहे. ही प्रक्रिया पूर्णतः ऐच्छिक आहे. या प्रकरणी कुणावरही जोर जबरदस्ती केली जात नाही. पण आता वीज वितरण कंपनी वेगवेगळी कारणे सांगून ग्राहकांवर स्मार्ट मीटर बसवण्यासाठी दबाव टाकत आहे. अनेक ग्राहकांना त्यांच्या वीज वापरात कोणताही मोठा बदल नसतसाना कमी किंवा जास्त बिल येत असल्याचा आरोप करत मीटरच्या तपासणीसाठी पथके पाठवली जात आहेत. ही पथके घरी आल्यानंतर संबंधितांना ॲक्यू चेक यंत्राद्वारे तपासणी करून मीटर 'स्लो' किंवा 'नादुरुस्त' असल्याचे सांगितले जाते. त्यानंतर ग्राहकांना अतिरिक्त आकारणी करून मीटर बदलण्यात येते, असा आरोप महाराष्ट्र वीज ग्राहक संघटनेने केला आहे.

वीज ग्राहक संघटनेच्या मते, मीटर तपासणीसाठी वापरल्या जाणाऱ्या यंत्राची कार्यपद्धती ग्राहकांना समजावून सांगितली जात नाही. त्यामुळे वितरण कंपनी जे सांगेल त्यावर विश्वास ठेवण्याशिवाय ग्राहकांकडे कोणताही पर्याय नाही. याची स्वतंत्र पडताळणी झाली पाहिजे. वितरण कंपनीशिवाय स्वतंत्र न्यायवैद्यक प्रयोगशाळेमार्फत मीटर तपासणी झाली पाहिजे. कारण, ती तटस्थ संस्था असल्याने तपासणी अधिक विश्वासार्ह ठरू शकते. मीटर दोषी आहे की नाही, हे वितरण कंपनीनेच ठरवायचे आणि त्यानंतर त्याच कंपनीने मीटर बदलायचे ही प्रक्रिया काहीशी संशयास्पद आहे.

वीज ग्राहक संघटनेच्या माहितीनुसार, वीज कायदा २००३ मधील कलम ५५ व कलम ४७(५) नुसार ग्राहकांना मीटर निवडीचा अधिकार आहे. पण या तरतुदीकडे दुर्लक्ष करून जबरदस्तीने स्मार्ट मीटर बसवले जात आहे. स्मार्ट मीटर विरोधात हायकोर्टात याचिका प्रलंबित असल्याची बाबही संघटनेने या प्रकरणी निदर्शनास आणून दिली आहे. मीटरमध्ये छेडछाड किंवा वीज चोरीचे आरोप ग्राहक सहजपणे स्वीकारत नाहीत. त्यामुळे मीटर फास्ट आहे की स्लो हे वितरण कंपनीने ठरवू नये. या प्रकरणी स्वतंत्र संस्थेचा अहवाल आवश्यक आहे.

ग्राहकांमध्ये या प्रकरणी असणारी नाराजी लक्षात घेता कंपनीने पारदर्शक भूमिका घ्यावी अन्यथा परिस्थिती चिघळू शकते, असा इशाराही संघटनेने या प्रकरणी दिला आहे.

•मीटर तपासणीसाठी स्वतंत्र संस्था नियुक्त करावी., न्यायवैद्यक प्रयोगशाळेमार्फत तपासणी करावी., ग्राहकांची संमती घेतल्याशिवाय स्मार्ट मीटर बसवू नयेत., वाढीव आकारणीबाबत स्पष्ट माहिती द्यावी., मीटर तपासणी प्रक्रिया पारदर्शक करावी.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ३० मे २०२६


## सेवानिवृत्तीनंतर इतिहास विषयात प्राप्त केली पीएच.डी. पदवी



**लातूर (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** ज्ञानसाधना ही अखंड चालणारी प्रक्रिया असून शिक्षणासाठी वयाचे कोणतेही बंधन नसते, हेच उमरगा तालुक्यातील जिल्हा परिषद केंद्रीय शाळेचे सेवानिवृत्त केंद्रप्रमुख कमलाकर मोटे यांनी आपल्या कार्यातून सिद्ध करून दाखवले आहे. नुकतीच त्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाकडून इतिहास विषयात विद्यावाचस्पती (पीएच. डी.) ही सर्वोच्च पदवी प्राप्त झाली आहे. सेवानिवृत्तीनंतरही अत्यंत जिद्दीने अभ्यास करून ही डॉक्टरेट मिळवल्याबद्दल लातूर येथील नामांकित एसजी प्रो. अकॅडमीचे संचालक प्रा. सत्यवान सूर्यवंशी यांच्या हस्ते शनिवारी (ता. २३) रोजी डॉ. कमलाकर मोटे सरांचा विशेष सत्कार करण्यात आला.या गौरव सोहळ्याप्रसंगी धाराशिव जिल्ह्याचे महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे जिल्हा कार्याध्यक्ष प्रा. डॉ. महेश मोटे, अकॅडमीचे संचालक सोमनाथ गलांडे तसेच लातूर येथील धुळेकर कोचिंग क्लासेसचे संचालक प्रा. अर्जुन धुळेकर आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.डॉ. कमलाकर मोटे यांनी उमरगा येथील छत्रपती शिवाजी महाविद्यालयाचे इतिहास विभागप्रमुख प्रा. डॉ. भीम माने यांच्या मार्गदर्शनाखाली आपला शोधप्रबंध पूर्ण केला. त्यांनी " लातूर शहराचा सामाजिक, आर्थिक व राजकीय इतिहास: एक चिकित्सक अभ्यास " या विषयावर अत्यंत सखोल संशोधन करून आपला प्रबंध विद्यापीठास सादर केला होता. त्यांच्या या संशोधनामुळे लातूरच्या स्थानिक इतिहासाचा एक महत्त्वाचा दस्तऐवज समोर आला आहे. डॉ. मोटे सरांनी आपल्या शासकीय सेवाकाळात शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन त्यांना महाराष्ट्र शासनाचा आदर्श शिक्षक पुरस्कार तसेच विविध नामांकित सामाजिक संस्थांकडून राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. याशिवाय, रोटरी क्लब मुरुम सिटीचे अध्यक्ष म्हणून काम करताना त्यांनी ग्रामीण भागात भरीव सामाजिक कार्य उभे केले. विशेष म्हणजे, त्यांनी स्वतः मरणोत्तर देहदानाचा संकल्प करून समाजासमोर एक आदर्श सामाजिक बांधिलकीचा वस्तुनिष्ठ वस्तुपाठ घालून दिला आहे. प्रा. सत्यवान सूर्यवंशी म्हणाले की, डॉ. मोटे सरांनी निवृत्तीनंतरही अखंड अभ्यास सुरू ठेवून मिळवलेले हे यश तरुण पिढीसाठी आणि स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या आमच्या अकॅडमीच्या विद्यार्थ्यांसाठी अत्यंत प्रेरणादायी आहे. यश मिळवण्यासाठी केवळ जिद्द, चिकाटी आणि अभ्यासाची ओढ असावी लागते, वयाचा तिथे काहीही संबंध नसतो, हेच मोटे सरांनी दाखवून दिले आहे. त्यांच्या या यशाचा एसजी प्रो. अकॅडमी परिवाराला सार्थ अभिमान आहे. सेवानिवृत्तीनंतरही शिक्षणाचा ध्यास न सोडणाऱ्या डॉ. कमलाकर मोटे सरांचे या यशाबद्दल संपूर्ण धाराशिव व लातूर जिल्ह्यातील शैक्षणिक, राजकीय व सामाजिक क्षेत्रातून सर्व स्तरांवरून विशेष कौतुक व अभिनंदन होत आहे.






## डॉ. अनिता अग्रवाल यांची प्राचार्यपदी निवड



**छत्रपती संभाजीनगर :** मराठवाडा लीगल अँड जनरल एज्युकेशन सोसायटी संचलित डॉ. सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महिला महाविद्यालयाच्या प्राचार्यपदी डॉ. अन्विता अग्रवाल यांची निवड करण्यात आली आहे. त्यांनी दिनांक २५ जून २०२६ रोजी प्राचार्यपदाचा पदभार स्वीकारला.डॉ. अन्विता अग्रवाल या महाविद्यालयातील गृहशास्त्र विभाग प्रमुख म्हणून कार्यरत असून गेल्या वीस वर्षांपासून त्या अध्यापन, संशोधन तसेच प्रशासकीय क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करत आहेत. विद्यार्थिनींच्या शैक्षणिक प्रगतीबरोबरच त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकास, नेतृत्व गुण आणि सर्वांगीण उन्नतीसाठी त्यांनी सातत्याने मोलाचे योगदान दिले आहे.शैक्षणिक क्षेत्रातील त्यांचा प्रदीर्घ अनुभव, कार्यतत्परता, कुशल नेतृत्व आणि प्रशासकीय दृष्टीकोन यांचा लाभ महाविद्यालयाच्या प्रगतीसाठी निश्चितच होईल, असा विश्वास संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.डॉ. अग्रवाल यांच्या निवडीबद्दल संस्थेच्या वतीने तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थिनी आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन करून त्यांना हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत.

## कन्नड येथे स्वातंत्र्यवीर सावरकर जयंती मोठ्या उत्साहात साजरी



**कन्नड (अरुण थोरात) :** स्वातंत्र्यवीर सावरकर जयंती निमित्त दि.२८ मे रोजी कन्नड येथे भव्य रक्तदान शिबिर व व्याख्यान मेळावा आयोजित केले होता. या कार्यक्रमाची रूपरेषा सावरकरांच्या प्रतिमेचे पूजन व विनम्र अभिवादन तदनंतर स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या दृष्टीने हिंदुत्व या विषयावरती बालण्यासाठी प्रमुख वक्ते म्हणून हभप. गौरव महाराज खरे यांचे व्याख्यान आयोजित केले होते. दत्ताजी भाले रक्त केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य रक्तदान शिबिराचे देखील आयोजन केले होते.स्वातंत्र्यवीर सावरकरांचे विचार मांडत असताना स्वातंत्र्यवीर सावरकरांनी आपल्या देशासाठी धर्मासाठी हिंदुत्वासाठी कोणत्याही प्रकारची तमा न बाळगता किती तरी दुःख यातून सहन करून आपल्या देशाला ब्रिटिशांच्या ताब्यातून सोडवण्यासाठी आणि हिंदू समाज एकत्र येण्यासाठी अतोनात प्रयत्न केले, त्यामध्ये सावरकरांना झालेली काळ्यापाण्याची शिक्षा, अंदमानातला तुरुंगवास, सावरकरांची समुद्रातली उडी अशा अनेक विषयावरती प्रकाश टाकत सावरकरांचे हिंदुत्व साठीचे विचार व्यक्त केले.त्याच बरोबर सुप्रिया कुलकर्णी यांनी देखील स्वातंत्र्यवीर सावरकरांबद्दल विचार मांडताने त्यांनी लिहिलेल्या काव्यांवर प्रकाश टाकला.

या कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती यावेळी या कार्यक्रमाचे संस्थापक अध्यक्ष शशिन वाल्मिकराव जाधव, अध्यक्ष विजय सुपडू वाणी, उपाध्यक्ष प्रवीण दशरथ आहिरे, सचिव संजय हरी जोशी, सहसचिव अरविंद राठोड, सदस्य अभिषेक शेळके, ऋषिराज वैष्णव, ज्येष्ठ स्वयंसेवक पाडळकर गुरुजी, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ सिल्लोड जिल्हा संघचालक शेखर जी मांडे, कालिदास उपासनी आदी उपस्थित होते.दत्ताजी भाले रक्तपेढीचे डॉ. अमरसिंग सातपुते तसेच प्रशांत चिटणीस, योगेश दहिवाल, अजिनाथ बडख, आरती बामणे, वर्षा घुमरे, दुर्गा वाघ, विजय पैठणकर, सुभाष कदम हे सुद्धा यावेळी उपस्थित होते. यादरम्यान एकूण 29 रक्तदात्यांनी रक्तदान केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिपक जी शिरसाट यांनी केले तसेच प्रास्ताविक मयूर राठोड यांनी मांडले, अध्यक्षीय समारोप संजय जोशी यांनी केला तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रमोद ढोले यांनी केले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ३० मे २०२६


## लाल

मिरचीचा रंग
लालच लाल
डोळ्यात आले पाणी
किती खाल

रक्ताचा रंग
लालच लाल
जखम होता
होतात हाल

जास्वंदीचा रंग
लालच लाल
माळी मारेन
जर चोरून न्याल

चेंडूचा रंग
लालच लाल
पाहून फुलेल
बाळाचे गाल

टरबूज कापता
लालच लाल
पोट दुखेल
किती खाल?




**- रवींद्र चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६


## मुखी असू द्यावे

दोन शब्द प्रेमाचे,
मुखी असू द्यावे.
नित्य प्रेम देऊन,
सदा प्रेमच घ्यावे..... १

प्रेम द्यावे प्रेम घ्यावे
प्रेमात आनंदी व्हावे
प्रेमाचे दोन शब्द सदा
प्रेमाने बोलत जावे.... २

प्रेमाने मन जिंकून
सदैव वैर टाळावे
प्रेम वाटता वाटता
जगालाच जिंकावे.... ३

जगी प्रेम देणाऱ्यास
बदल्यात प्रेम मिळते
प्रेम दिल्यावरच प्रेम
आपल्या मनास कळते..४

असा हा प्रेमाचा लळा
साऱ्या जगास लावावे
प्रेमळ जगात प्रत्येकाने
सदा प्रेमानेच वागावे....५




**नागेश बोंतेवाड,**
छत्रपती संभाजीनगर


# अधिकमासात तीर्थक्षेत्रांना भेटी अर्ध्या तिकीटाताच





**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** अधिकमासाच्या पवित्रमहिन्यात भाविक मोठ्या संख्येने विविध तीर्थक्षेत्रांना भेट देत असतात. भाविकांची ही गर्दी आणि त्यांची सोय लक्षात घेता,राज्य मार्ग परिवहन महामंडळाने "एसटी संगे तीर्थाटन' ही विशेष योजना तीर्थाटन सुरू केली आहे. या योजनेंतर्गत भाविकांना आता अर्ध्या तिकिटात देवदर्शन घडणार असून, एसटीने या कालावधीत विशेष नियोजन केले आहे. या योजनेंतर्गत विविध तीर्थक्षेत्रांना भाविकांना भेटी देणे सोयीचे ठरत आहे.

एसटी प्रशासनाने महिला आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी असलेल्या सवलती अधिक प्रभावीपणे लागूकेल्या आहेत. यात महिला, मुलेआणि ज्येष्ठांना बसच्या तिकिटात५० टक्के सवलत (अर्धे तिकीट)दिली जात आहे. तसेच अमृत ज्येष्ठ नागरिक योजनेनुसार ७५ वर्षावरील नागरिकांना एसटीचा प्रवास मोफत आहे. या सवलतींमुळे अधिकमासातील तीर्थयात्रा आता अधिक सुखकर झाली आहे.काय आहे 'एसटी संगेतीर्थाटन' योजनाएसटी महामंडळाने तीर्थयात्रेलाजाणाऱ्या भाविकांसाठी ही योजना सुरू केली आहे. यामध्ये महिला मंडळे, भजनी मंडळे, ज्येष्ठ नागरिकांचे गट, बचतगट किंवा ४० नागरिकांचा समूह एकत्र येऊन एसटी बस बुक करू शकतात. खासगी वाहनांच्या तुलनेत सुरक्षित आणि खिशाला परवडणारा प्रवास व्हावा, या उद्देशाने ही योजना राबवली जाते.योजनेचा लाभ कसा घ्यावा?ज्या भाविक गटांना किंवा मंडळांना या योजनेचा लाभ घ्यायचा आहे, मागणीनुसार बस उपलब्धकरून देण्याबाबत एसटीचे नियोजनपूर्ण झाले आहे. ४० प्रवासी गट त्यांना हव्या त्या मार्गावर बस उपलब्ध करून दिली जाते." अधिकमासात भाविकांचीमोठी गर्दी लक्षात घेता एसटी महामंडळ सज्ज आहे.'एसटी संगे तीर्थाटन' योजनेमुळेभाविकांना सुरक्षित आणिकिफायतशीर प्रवास करणे शक्यहोणार आहे. ४० नागरिकांचा गटएकत्र आल्यास स्वतंत्र बसची सोय करून दिल्या जाते. प्रवाशांना सुरक्षित सेवा देण्यासाठी एसटी प्रशासन तत्पर असल्याची माहिती आनंद चव्हाण (आगार प्रमुख)यांनी दिली.

प्रवाशांच्या गटाला मिळणार गावात बसभाविकांची गैरसोय टाळण्यासाठी जिंतूर आगाराने तीर्थक्षेत्रांसाठी विशेष वेळापत्रक आखले आहे.यामध्ये ४० जणांचा गट असल्यास त्यांना हव्या त्या मार्गावर बस उपलब्ध करून दिल्या जात असल्याची माहिती स्थानिक महामंडळ प्रशासनाने दिली आहे.

# खडतर हवामानावर मात; मुरूम सुपुत्रांची एव्हरेस्ट बेस कॅम्पवर यशस्वी चढाई...




**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** कोल्हापूरच्या करवीर हायकर्स संस्थेच्या सात सदस्यांच्या पथकाने प्रतिकूल हवामानाचा सामना करत ५,३६४ मीटर उंचीवरील एव्हरेस्ट बेस कॅम्प यशस्वीरीत्या सर केला. या मोहिमेत तिरंगा फडकवत भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन करण्यात आले. मोहिमेचा प्रवास १५ मे रोजी काठमांडू येथून मोहिमेला सुरुवात झाली. लुकला विमानतळापासून सुरू झालेला हा प्रवास फाकडींग, नामचे बाजार, तेंगबोचे, दिंगबोचे आणि लोबुचे मार्गे पूर्ण करत पथकाने एव्हरेस्ट बेस कॅम्प गाठला. कस्तुरी सावेकर यांच्या नेतृत्वाखाली पार पडलेल्या या मोहिमेत उणे १५ अंश सेल्सिअस तापमानासह विरळ ऑक्सिजन आणि तीव्र वाऱ्यांशी सदस्यांना झुंज द्यावी लागली. मोहिमेत राहुल गायकवाड (उपजिल्हा निवडणूक अधिकारी, रत्नागिरी), प्रशांत सातपुते (जिल्हा माहिती अधिकारी), डॉ. सुप्रिया सातपुते, आप्पासाहेब मुंडासे (मुरूम), विशाल मेहता (कोल्हापूर) आणि नुपूर व अक्षय मठकर यांचा समावेश होता.

स्थानिक मार्गदर्शक शेखर तमांग, योगेंद्र तमांग आणि प्रशांत तमांग यांचे मोलाचे सहकार्य लाभले.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com


छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ३० मे २०२६


## आपण अहिल्यादेवींचे वंशज आहोत, संघर्ष स्वाभिमान व नैतिकतेचा वारसा जपा; गोपीचंद पडळकर यांचे आवाहन...




**लातूर (प्रा.सुधीर पंचगल्ले) :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर या आपल्या प्रेरणास्थान आहेत. त्यांचे कार्य आणि विचार केवळ स्मरणात ठेवून चालणार नाही, तर ते आपल्या आचरणात आणणे गरजेचे आहे. आपण अहिल्यादेवींचे वंशज आहोत, संघर्ष, स्वाभिमान व नैतिकतेचा वारसा जपण्याचे आव्हान भाजपचे नेते आमदार गोपीचंद पडळकर यांनी केले.भारतीय संस्कृती, समाजकारण आणि स्त्रीशक्तीचा गौरव करणाऱ्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जन्मउत्सवानिमित्त लातूर येथील पार्वती मंगल कार्यालयात शनिवारी (ता. २३) रोजी आदर्श नारी सन्मान सोहळा अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या सोहळ्यास जम्मू-काश्मीरचे भाजप एसटी मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष प्रवीणकुमार जरीयल, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश प्रवक्ते शशिकांत तरगे, भाजप किसान मोर्चाचे प्रदेश सचिव माऊली हळणकर, कर्नाटकच्या कुरुबा संघ महिला प्रदेशाध्यक्ष प्रभावती के. आर., शिवसेनेचे जिल्हा प्रमुख सचिन दाणे आदी विविध राजकीय आणि सामाजिक क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.या कार्यक्रमात उत्तर प्रदेश येथील प्रयागराज च्या आमदार श्रीमती पूजा पाल यांना आदर्श नारी सन्मानाने सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाजपचे नेते तथा जतचे आमदार गोपीचंद पडळकर होते. मुख्य सत्कारमूर्ती म्हणून उत्तर प्रदेशच्या प्रयागराज येथील आमदार श्रीमती पूजा पाल उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष भारतीय किसान युनियनचे प्रदेश प्रवक्ता राजकुमार सस्तापुरे होते.समाज बांधवांना मार्गदर्शन करताना पडळकर यांनी ऐतिहासिक वारसाचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी उपस्थित सर्वांना मध्यप्रदेशातील महेश्वर, इंदोर आणि महाराष्ट्रातील चौंडी या ऐतिहासिक ठिकाणांना प्रत्यक्ष भेट देऊन त्यांचे स्मरण कायम ठेवण्या करिता आव्हान केले. समाज बांधवांनी संघर्ष, स्वाभिमान, नैतिकता, प्रामाणिकपणा आणि निष्ठा या मूल्यांची जपणूक करून समाजाची मान उंचावेल असे कार्य करावे. धनगर समाजाच्या आरक्षणाच्या मुद्द्यावर बोलताना गोपीचंद पडळकर यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. ते म्हणाले, धनगर समाजाला एसटी प्रवर्गात आरक्षण मिळावे, यासाठी मी सुरुवातीपासूनच प्रामाणिकपणे प्रयत्न करीत आहे. माझ्यासाठी माझा समाज सर्वतोपरी आहे. समाजाचे प्रश्न सुटणे ही माझी प्राथमिकता आहे आणि त्यानंतरच इतर प्रश्न माझ्यासाठी महत्त्वाचे आहेत.समाज हितासाठी आणि आरक्षणाच्या लढाईसाठी आपण पूर्ण निष्ठेने आणि ठामपणे लढत असल्याचे आश्वासन त्यांनी यावेळी दिले. या सोहळ्यात परंपरागत पद्धतीने आ. श्रीमती पूजा पाल यांचा फेटा, घोगडी, काठी, अहिल्यादेवींची चांदीची मूर्ती, सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महिलांचाही या वेळी विशेष सत्कार करण्यात आला. आ. पूजा पाल म्हणाले की, माता अहिल्यादेवी होळकर यांनी आपल्या कार्यकाळात लोककल्याण आणि महिला सक्षमीकरणाचा जो आदर्श घालून दिला, तो आजही महिलांसाठी मार्गदर्शक आहे. धनगर समाज बांधवांनी आणि विशेषतः महिलांनी शिक्षण आणि संघर्षाच्या जोरावर स्वतःची ओळख निर्माण करावी. अहिल्यादेवी केवळ एक राणी नव्हत्या, तर त्या एक कुशल प्रशासक आणि समाजसुधारक होत्या. न्यायप्रियता आणि प्रजेच्या हितासाठी त्यांनी दिलेला लढा आजही आपल्या सर्वासाठी प्रेरणादायी आहे. त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याची जबाबदारी समाजातील प्रत्येक महिलेची आहे. केवळ कुटुंबाची जबाबदारी पेलणे म्हणजे जीवन नव्हे, तर समाजात स्वतःचे स्थान निर्माण करणे महत्त्वाचे आहे. आजच्या युगात शिक्षणाशिवाय पर्याय नाही. धनगर समाजातील महिलांनी स्वतःच्या पायावर उभे राहून, आपल्या हक्कांच्या आणि अधिकारांच्या जाणीवेतून एक नवी क्रांती घडवून आणावी. समाजाच्या प्रगतीसाठी एकजूट असणे गरजेचे आहे. जेव्हा समाजातील महिला प्रगती करतात, तेव्हाच पूर्ण समाजाचा सर्वांगीण विकास होतो. त्यांनी स्वतःच्या राजकीय संघर्षावरही भाष्य केले. कठीण प्रसंगात डगमगून न जाता धैर्याने उभे राहणे हीच खरी नारीशक्ती आहे, असे त्या म्हणाल्या.या प्रसंगी उपस्थितांना मार्गदर्शन करताना शशिकांत तरंगे जम्मू कश्मीर येथील प्रवीण कुमार जरीयाल, माऊली हळणकर, गणेश हाके, प्रभावती के. आर., आदींनी सांगितले की, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य हे आजही समाजव्यवस्थेसाठी दीपस्तंभ आहे. या कार्यक्रमाचा मुख्य हेतू केवळ सत्कार करणे हा नसून, समाजातील स्त्रिशक्तीचा सन्मान करून सकारात्मक सामाजिक परिवर्तन घडवून आणणे हा आहे. अहिल्यादेवींच्या कार्याची प्रेरणा घेऊन समाजाने संघटित होण्याचे आवाहनही मान्यवरांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राजकुमार सस्तापुरे यांनी केले. सूत्रसंचालन गणेश बेळंबे यांनी तर आभार प्रा. डॉ. महेश मोटे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी उमाकांत भंडारे, धनुष्य टिळे, प्रा. डॉ.मुकुंद धुळेकर, प्रा. डॉ. सतीश शेळके, उद्योजक हरिभाऊ काळे, सूर्यकांत भोसले, झटिंग (अण्णा) म्हेत्रे, बालाजी लव्हे, श्याम माने, सदाशिव अभंगे, सीए बालाजी माने, भीमसेन म्हेत्रे, राजेश पाटील, विनोद पांढरे, बापू मदने, निर्भय कोरे, महादेव नागमोडे, शिवाजी शेळके, धनाजी भंडारे, गोपीनाथ भोकरे, प्रा. हनुमंत वागलगावे, वसंत कंदगुळे आदी संयोजन समितीच्या सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले. सोहळ्यासाठी मराठवाडा आणि कर्नाटक राज्यातून मोठ्या संख्येने नागरिक व समाजबांधव उपस्थित होते.

## कन्नड नगर परिषदेत डॉ. सदाशिव पाटील यांचा सत्कार



**कन्नड (अरुण थोरात) :** कन्नड नगर परिषद च्या वतीने "गुणगौरव पुरस्कार" प्राप्त झालेले डॉ. सदाशिव पाटील यांचा दि.२८ मे रोजी नगरपालिकेत उत्साहपूर्ण वातावरणात सत्कार करण्यात आला. लोकनियुक्त नगराध्यक्षा फरीन बेगम अब्दुल जावेद सेठ, मा.उपनगराध्यक्ष तथा नगरसेवक अब्दुल जावेद सेठ, न.प. मुख्याधिकारी रवींद्रजी लांडे, यांच्या हस्ते डॉ. पाटील यांना शाल, पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. डॉ. सदाशिव पाटील यांनी वैद्यकीय, सामाजिक, शैक्षणिक व जनहिताच्या क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत त्यांना प्राप्त झालेल्या गुणगौरव पुरस्कार" बद्दल मान्यवरांनी अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी राष्ट्रवादी गटनेता व नगरसेवक संतोषभाऊ निकम, नगरसेवक कचरू आव्हाळे उर्फ गजानन शेठ, संदीप घोगते, राजेंद्र सोनार, पत्रकार राजनंद सुरडकर, पत्रकार प्रवीण जंजाळ, सर्पमित्र अनिल शिरसे, गोकुळ भाऊ राठोड, विजय भाऊ शिरसाट, भाजप युवा मोर्चा तालुका अध्यक्ष पवन ठाकूर, प्रकाश काचोळे, माजी नगरसेवक असद पवार, इरफान हाजी भाई, सोमनाथ दाभाडे, यासीन भाई शेख, राजू भाई शेख उर्फ राजू कमिटी. कोमल ताई खरे तसेच शहरातील पत्रकार बंधू-भगिनी, नगर परिषद पदाधिकारी, कर्मचारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी डॉ. पाटील यांच्या कार्याचे कौतुक करत गौरवोद्गार काढले व समाजासाठी त्यांनी केलेल्या योगदानाबद्दल अभिनंदन केले.





बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ३० मे २०२६

## डॉ. पाटील यांच्या सहकार्याने पिशोर नाका रस्त्यावर बसविले रेडियम पोल



**कन्नड (अरुण थोरात) :** पिशोर नाका कन्नड येथे डिव्हायडर न दिसल्यामुळे वाहने रात्री बे रात्री चढतात. यामुळे ही समस्या दूर करण्यासाठी राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त समाजसेवक तथा मा. उपनगराध्यक्ष डॉ. सदाशिव पाटील यांच्या नेतृत्वाखाली सामाजिक कार्यकर्ते शेख शमशू भाई यांच्या सहकार्याने, समाजसेवक सलीम शेख, पिंटू सोनवणे, रिझवान मिस्तरी, व्यापारी पवन सेठ पांडे, रईस पवार, योगेश पाखले आप्पा मित्र मंडळ यांच्या पुढाकाराने दि. २६ म रोजी रात्री साडेबारा वाजता डीवाईडरच्या दोन्ही बाजूला रेडियमचे पोल उभा करून त्याच्यावर रेडियम लावण्यात आले. कन्नड शहराचे क्रांती चौक समजल्या जाणाऱ्या पिशोर नाका हे मोठ्या वर्दळीचे ठिकाण आहे. परिसरात व्यापाऱ्यांचे लहान मोठे व्यवसाय प्रतिष्ठान आहेत. तसेच बँका हि पिशोर नाक्यावरती आहेत. पिशोर नाक्या वरती चाळीसगाव,सिल्लोड मार्गे येणाऱ्या व कन्नड शहरात येणारा एक मुख्य चौक आहे. कन्नड वरून चाळीसगावला धुळे सुरत ला जाणारा हा एक मुख्य रस्ता आहे. मात्र गेल्या अनेक वर्षापासून कार, टेम्पो, ट्रक, मोटरसायकल व रिक्षा या धडकून अनेक अपघात झाले आहेत. हा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अंतर्गत येतो. परंतु या विभागाच्या अधिकाऱ्यांनी याकडे गेल्या वीस वर्षे पासून दुर्लक्ष केले होते.

रस्ता नगरपालिकेच्या हद्दीतूनच तसेच छोटे मोठे व्यावसायिकांनी रोड वरती अतिक्रमणे केलि आहेत. या बाबींचा विचार करुन दोन्ही बाजूला रेडियम चे पोल उभे करण्यात आले आहेत. त्याबद्दल डॉ. सदाशिव पाटील व मित्रमंडळाचे आभार व्यक्त केले आहेत.

## सहाय्यक संचालक विजयकुमार कलवले यांच्या पाठपुराव्याला यश; दु:खाच्या डोंगराखाली दबलेल्या कुटुंबाला मोठा दिलासा





**अतनुर (प्रा.सुधीर पंचगल्ले) :** निवडणुकीचे शासकीय टपाल पोहोचवण्यासाठी निघालेला एक कर्तव्यदक्ष होमगार्ड जवान रस्त्यात काळाच्या पडद्याआड गेला... घरातील कर्ता पुरुष हरपल्याने पत्नी, वृद्ध आई आणि अवघ्या तीन वर्षांच्या चिमुकल्याच्या आयुष्यावर दुःखाचा डोंगर कोसळला... मात्र या दुःखद प्रसंगात शासन आणि होमगार्ड विभागाने माणुसकीची साथ देत या कुटुंबाला तब्बल ५० लाख रुपयांचा आर्थिक आधार मिळवून दिला आहे.जळकोट तालुक्यातील गुत्ती येथील होमगार्ड जवान ज्ञानेश्वर प्रकाश केंद्रे यांचा २३ जानेवारी रोजी कर्तव्य बजावत असताना भीषण अपघातात मृत्यू झाला होता. या घटनेनंतर केंद्रे कुटुंब अक्षरशः उघड्यावर पडले होते. मात्र राज्याच्या गृहरक्षक दलाचे सहाय्यक संचालक विजयकुमार कलवले, अप्पर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण, जिल्हा समादेशक कार्यालयाचे प्रशासकीय अधिकारी संतोष देव,कृषीउत्पन बाजार समितीचे माजी सभापती मन्मथ किडे,पत्रकार माजीद मोमीन आणि संबंधित अधिकाऱ्यांच्या अथक पाठपुराव्यामुळे कुटुंबाला ५० लाख रुपयांची मदत मिळाली.चिमुकल्याच्या भवितव्याला नवी उभारीज्ञानेश्वर केंद्रे यांच्या पश्चात पत्नी, वृद्ध आई आणि तीन वर्षांचा मुलगा असा परिवार आहे. कर्ता पुरुष गेल्याने कुटुंबासमोर उदरनिर्वाहाचा प्रश्न उभा राहिला होता. मात्र आता मिळालेल्या ५० लाखांच्या मदतीमुळे या कुटुंबाला आर्थिक स्थैर्य मिळणार असून चिमुकल्याच्या शिक्षण व भवितव्याची चिंता मोठ्या प्रमाणात कमी झाली आहे.तुम्ही एकटे नाही' म्हणत विजयकुमिर कलवले यांनी आधार देण्यासाठी मदतीचा हात पुढे केला.या दुर्दैवी घटनेची माहिती मिळताच सहाय्यक संचालक विजयकुमार कलवले यांनी कुटुंबीयांशी संपर्क साधून धीर दिला. केवळ सांत्वन न करता त्यांनी मदतीसाठी तातडीने शासकीय स्तरावर पाठपुरावा सुरू केला. अपघाताच्या दिवसापासूनच संबंधित अधिकाऱ्यांनी कुटुंबाला मानसिक आणि प्रशासकीय आधार दिला.

कर्तव्याच्या वाटेवर काळाचा घाला - २३ जानेवारी रोजी ज्ञानेश्वर केंद्रे हे उदगीर होमगार्ड विभागातून जळकोट पोलीस ठाण्यात हजर झाले होते. निवडणुकीच्या कामाचे टपाल अहमदपूर येथे सुपूर्द करून ते पुढील टपाल घेऊन वाढवणा पोलीस ठाण्याकडे जात होते. मात्र वायगाव पाटी-हाळी मार्गावर आयशर टेम्पोने दिलेल्या भीषण धडकेत त्यांचा जागीच मृत्यू झाला.कर्तव्य निभावत असताना झालेल्या या अपघाताने संपूर्ण परिसर हळहळला होता.

पोलीस व गृहरक्षक दल यंत्रणाही धावून आली - मदत मंजुरीसाठी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता, पंचनामे, अहवाल आणि प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी वाढवणा पोलीस ठाण्याचे प्रभारी पोलीस निरीक्षक सुनील गायकवाड, पोलीस कर्मचारी शिवाजी केंद्रे,होमगार्ड तालुका समादेशक अधिकारी बाबुराव रतनलाल शिंदे ,प्रशासकीय अधिकारी संतोष देव,अंशकालीन लिपिक शिवदास काकडे व इतर कर्मचाऱ्यांनी मोलाची भूमिका बजावली. त्यामुळे मदतीचा प्रस्ताव वेगाने मंजूर होण्यास मदत झाली.

विजयकुमार कलवले यांनि दिला माणुसकीचा हात - दुर्दैवी घटनेची माहिती मिळताच सहाय्यक संचालक विजयकुमार कलवले यांनी तत्काळ कुटुंबीयांशी संपर्क साधून त्यांचे सांत्वन केले. तसेच शासनाकडून मिळणारी सर्व मदत वेळेत मिळावी यासाठी पाठपुरावा सुरू केला. अपघाताच्या दिवसापासूनच संबंधित अधिकाऱ्यांनी कुटुंबाला मानसिक आधार देत मदतीचा हात पुढे केला

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड प्रिंटर्स

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.

मो. 8087880274,8956362639, 9270446603, 9405109103

डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन


महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशनचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ट कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274

Email - sahilcomputer05@gmail.com

## ठाकरवाडी गावात पाणीटंचाईचा प्रश्न गंभीर



**खुलताबाद (सनिराम गावंडे) :** खुलताबाद तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत कार्यालय निरगुडी बु अंतर्गत ठाकरवाडी, देवठाणवाडी या गावांत पाणीटंचाईचा प्रश्न गंभीर बनला आहे. ग्रामपंचायतीने ट्युब लेवल नळ दिले पण पाणी येत नाही, ही गंभीर समस्या ठाकरवाडी , देवठाणवाडी मध्ये आहे ठाकरवाडी गावाला दरवर्षी फेब्रुवारी महिन्यापासून ते ऑगस्ट महिन्यापर्यंत पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. मग या ट्यूब लेवल नळाचा उपयोग तरी काय? ग्रामपंचायत चा पाणीपुरवठा निरगुडी बु ठाकरवाडी या धरणाच्या पाठीमागे शंभर ते दोनशे मीटर अंतरावर ग्रामपंचायतीची विहीर आहे. येथून ठाकरवाडीतील टाकीमध्ये पिण्याच्या पाण्याचा पाणीसाठा होत असतो परंतु लोकसंख्यापेक्षा टाकी लहान असल्यामुळे ठाकरवाडी, देवठाणवाडी या वाड्यांना पिण्यासाठी पाणी वेळेवर मिळत नाही. शासकीय विहीरी मधून निरगुडी बु, बोहळी तांडा,भिलवाडी, ठाकरवाडी, देवठाणवाडी, या गावांना पाणी पुरवठा केला जातो. विहीरीचा जलसाठा कमी आहे त्यामुळे ठाकरवाडी, देवठाणवाडी या वाड्यांना कायमस्वरूपी पाणी टंचाई भोगावी लागते दोन -दोन महीने पाणी नळाला सोडले जात नाही.नळ हे पाण्याविना मोडकळीस आले आहेत. धरण उशाला आणि कोरड घशाला अशी या ठाकरवाडीची पिण्याच्या पाण्यासाठी अवस्था झालेली आहे या पाणीटंचाईसाठी ग्रामपंचायत कार्यालय कोणतेही लक्ष देत नसल्यामुळे या आदिवासी महिलांना पाण्यासाठी वणवण करावी लागते या ठाकरवाडी ला जल जीवन मिशन योजने पासून वंचित ठेवले आहे ग्रामपंचायत कार्यालयाला पाणीटंचाईचे वारंवार अर्ज देऊन ही ग्रामपंचायत दुर्लक्ष करीत असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. त्याचबरोबर जोपर्यंत पाणी सुरळीत चालू होणार नाही तोपर्यंत पाणी पट्टी भरणार नाही असे ग्रामस्थांनी मत व्यक्त केले व ठाकरवाडी, देवठाणवाडी या दोन वाड्यांकरिता नविन स्वतंत्र धरणात विहीर व पाईप लाईन शासनाने देण्यात यावे अशी आशा व्यक्त केली.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ३० मे २०२६

## शिपघाट ठाकरवाडी येथे तीव्र पाणी टंचाई, रस्ता मोकळा करण्याकरिता तहसीलदार यांना दिले निवेदन




**खुलताबाद (सनिराम गावंडे)** : ग्रामीण भागात साधारणतः एप्रिल महिन्यापासून पाणी टंचाईला सुरुवात होते.तसेच कन्नड तालुक्यातील शिपघाट ठाकरवाडी येथील नागरिकांनी पाणी टंचाई व पानंद रस्ता मोकळा करण्याकरिता दि.29 मे रोजी तहसीलदार श्रीमती सारीका भगत यांना निवेदन दिले.निवेदनात म्हटले आहे की,शिपघाट ठाकरवाडी येथे भीषण पाणी टंचाई चालू आहे आदिवासी ठाकर समाजाच्या महिलांना , चिमुकल्यांना पिण्याच्या पाण्यासाठी वणवण, कसरत करावी लागत आहे आदिवासी महिलांना पाणी आणण्यासाठी सरकारी विहीरीवर जावे लागत आहे या सरकारी विहिरीसाठी जुना रस्ता ३३ फुटांचा शिवाची पानंद रस्ता आहे पण तेथील शेतकरी अनिल विठ्ठल हाडोळे,भगवान पंडित हाडोळे,शिवाजी मकुंदा हाडोळे, यांनी अतिक्रमण करून संपूर्णपणे काढून घेतला आहे आम्ही गावातील पुरुष, महिला पाण्याला जात असताना यांनी आदिवासी ठाकर समाजाला व्यक्तींना महिलांना शिवीगाळ केली व जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या आहे असे आदिवासी ठाकर समाजाने आरोप केला आहे.सदर रस्ता माननीय तहसीलदार साहेबांनी तात्काळ मोकळा करून देण्यात यावा अशी तहसीलदार यांना विनंती केली आहे. तहसीलदार कन्नड यांना निवेदन देताना सह्याद्री आदीवासी म ठाकर - ठाकुर समाज उन्नती मंडळ महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष सरीचंद दोरे उपाध्यक्ष दुबळीराम पथवे व ग्रामस्थ विठ्ठल मेंगाळ, कोंडिराम कातवारे,संजय आगीवले,राजू आवाले,रामराव मधे,बाळू गांगड,रघुनाथ मेंगाळ,विष्णू कातवारे, वाळुबा मधे,कैलास कातवारे,पिंटू मधे,किसन मेंगाळ, कचरू मेंगाळ,संतोष पोकळे,रामभाऊ आगिवले,नाना आगिवले, आदी आदिवासी ठाकर समाज उपस्थित राहून तहसीलदार यांना निवेदन दिले तहसीलदार यांनी दोन दिवसात रस्ता मोकळा न केल्यास तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा देण्यात आला आहे.

## श्रमजीवी अध्यापक महाविद्यालयाची उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम




**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** येथील श्रमजीवी अध्यापक महाविद्यालयाचा विद्यापीठीय परीक्षा मार्च/एप्रिल २०२६ चा बी.एड. प्रथम वर्षाचा निकाल १०० % लागला असुन व द्वितीय वर्षाचा निकाल ९१% लागला. बी.एड. द्वितीय वर्षात महाविद्यालयात गुणानुक्रमे बिराजदार प्रतिक्षा सुभाष या विद्यार्थीने ९०.९०% गुण मिळवुन प्रथम क्रमांक मिळवला, सास्तुरे नौशिन महमंदसाब या विद्यार्थीनीने ९०.७०% गुण मिळवुन द्वितीय क्रमांक मिळवला, कुलकर्णी गार्गी सुरेश या विद्यार्थीनीने ९०.३०% गुण मिळवुन तृतीय क्रमांक मिळविला. प्रथम वर्षात महाविद्यालयात गुणांनुक्रमे बेळंबे राणी पंढरी या विद्यार्थीनीने ८४.४७% गुण मिळवून प्रथम क्रमांक, भुरे हिंदवी देवराज या विद्यार्थीनीने ८३.६०% गुण मिळवून द्वितीय क्रमांक, व पाटील प्रिती बालाजी या विद्यार्थीनीने ८३% गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळविला.

महाविद्यालयाच्या या उत्कृष्ट निकालाबद्दल संस्थेचे सरचिटणीस तथा माजी मंत्री मा. बसवराज पाटील साहेब, अध्यक्ष विनायकराव पाटील साहेब, चिटणीस मा. रामकृष्णपंत खरोसेकर साहेब, उमरगा बँकेचे चेअरमन तथा युवा नेते शरणजी भैय्या बसवराज पाटील साहेब, संस्थेचे सर्व संचालक, श्रमजीवी अध्यापक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय सरपे, प्राचार्य डॉ. राम सोलंकर आदिनी महाविद्यालयाच्या या उत्कृष्ट निकालाबद्दल अभिनंदन केले आहे.



महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ३० मे २०२६

# बयनामा : अस्सल ग्रामीण वास्तवाचे भेदक चित्रण




प्रथितयश कथा कादंबरीकार बा.बा.कोटंबे यांच्या बयनामा हा कथासंग्रह उत्तम आशय संपन्न समृद्ध कथा आहेत.मराठवाड्यातील बोली शैलीने ही कथा ही समृद्ध आहे.या कथासंग्रहात समकालीन वास्तवाचे अतिशय विदारक चित्रण आले आहे.बयनामा या कथासंग्रहात सोळा कथा आहेत.माणसं कशी गिरगुट झाली आहे.रंग बदलणारी.मानुसकीला काळीमा फासणारी.'आडकाठी'या कथेचा सारं बहिणींचं लग्न उरकायच.घरात शेतात वाटणी मागणारे भाऊ बापाला भांडता आहेत.लहान बहिण शेतात जीव देणारा आली आहे.नेमकं त्याचं दिवशी झाडाखाली झोपलेला भाऊ पाहतो.कांता शेतात आली आहे.एका दगडाखाली तिने चिठ्ठी लपवली.भाऊ ती चिठ्ठी वाचतो.माझ्यामुळे घरात आडकाठी झाली.पण भाऊ तसं होऊ देतं नाही.आता आई वडील आणि माझा संसार करून मी बहिणींचं लग्न करील.जी दोरी तिनं गळफास घेयला आनंदी होती.त्याचं दोरीनं कडबा बांधून बहिणीला पुढं घालून घरी घेऊन येतो.'पेच'या कथेतील नायक रघू.त्याची यमान घेतलेली फिरकी.तू बायको पोरांना घरच्यांना फसवले आहे.तूझे पाप वाढले तूला घेऊन जायला आलोय.रघूचं लफड आहे.ही अफवा गांवभर पसरते.आता शेती पोराच्या नावाने करून दिली पाहिजे.अन् नेमके तसे होते.पण गावभर बोंब आणि रघूचा अपमान हा पेच अतिशय उत्तम लेखकांने मांडला आहे.'चौकडी'आजच्या परिस्थितीचे मनस्वी दर्शन या कथेत येते.'शेतीचा धंदा आतबट्याचा आहे.शेती मालाला हमी भाव मिळाला पाहिजे.असे गावांत पारावर भाषण ठोकायला येतात.मानधन घेतात निघुन जातात.पण प्रत्येक विचारपिठावर सत्यवादी बोलायचं अन् कृती मात्र अतिशय वाईट.अशी ही 'चौकडी'कथा आज नुसत्या वल्गना ठोकणारे आहेत.'कुसूम'ही हळूवार प्रेमाची कहाणी आहे.प्रेम हे एक व्याकूळ रसायन आहे.पण प्रारब्धाच्या पुढे काहीच चालत नाही.या कथेतील नायिका आणि प्रियकर यांचे लग्न होतं नाही पण एका अधुऱ्या प्रेमाची ही ग्रामीण कथा मनातले कातरं भाव व्याकूळ करुन जातात.'सावली' रोहिदास कथेचा नायक.घरात कुणीचं नाही.भाकरी करून घालायला कोणी नाही.म्हणून शेजारच्या विधवा द्वारकानं रोहिदासला मदत केली.पोरगी कुणीही देईल.मामा बहिणीचा विरोध असताना एका विधवा द्वारका बरोबर तो मंदिरात जाऊन माळी घालतो.ती त्याच्या संसाराची त्याची सावली होऊन जाते.ही आशय संपन्न कथा म्हणजे आज विधावा स्त्रीची कुणी विवाह करीत नाही.तिचा गैरफायदा घेतात.बुजगावणं पंढरी सरपंच झाल्यापासून नुस्त्या झमिल्या.नुसत्या कटकटी, नवरा बायकोचे सतत भांडण या साऱ्या कटकटीचा राजीनामा देऊन सरपंच म्हणजे नुस्त बुजगावणं.पंढरी शेतात जाऊन गड्या बरोबर निवांत जेवतो."खरं म्हणतूस,चल मग,सोड भाकरी.आता मी ही जेवतो तुझ्या बरोबर.डोक्यावरचं वझ गेलं बघ'(पृ.68) 'पट्टी' 'जी पट्टी कालच दौलतरावच्या नावानं करु दिली होती'त्याच शेताच्या बांधावर कालच विठ्ठलरावांन आंब्याच्या फांदीला फाशी घेतली होती.आजचे समकाल वास्तव अर्ज,व्याज,बटा, आणि खाजगी सावकाराचा दटा अजून चालू आहे.पण सावरकरची चट्ठी पिवळी झाली जर विठ्ठलच्या खिशात माझ्या नावाची चिठ्ठी निघली तर!असा हा सारा बारापंच्यायती करत जगणं अजून संपलेलं नाही.'श्याम' या मित्राची कथा खोल्या करून शिक्षण.नोकरी बाप सांगेल त्या पोरीबर लग्न.नोकरी पुढे मित्र तुटत नाहीत पण भेट ही होत नाही.यात लेखक लिहितो "जात धर्म नसता तर स्वर्गातील देवांनासुध्दा पृथ्वीवर वास्तव्य करणाचा मोह झाला असता.मनुष्य धर्म हा सर्वश्रेष्ठ असताना इतर धर्माची आवश्यकता काय?(पृ.86) 'पालवी' या कथेची नायिका उर्मिला नवविवाहिता.पण नवराचं माणसांत नाही.सारे दु:खी होतात.तो जांभळीच्या झाडावरून पडला.अवघड जागी मार लागला.दवाखाना चालू आहे.पुण्याला तपासून आले.बरेचं दिवस गेल्यावर तिच्याजीवनात पालवी फुटते.अशी ही अतिशय हळुवारपणे वेदना देणारी कथा.'गुलमोहर'या कथेतील सुधाकर एक का◌ॅलेजकुमार प्रेम तुटलं म्हणून रेल्वेच्या पटीवर जीव देण्याच्या इराद्याने येतो.गेटमन त्याला अडवतो.शिक्षण कर नोकरी कर असे खुळचट विचार करून हे सुंदर जीवन संपवू नको.तू जीवनीशी जाशील.तू विसर.या प्रेमवीराचा जीव एका गेटमनने वाचवला.मनाचा गुलमोहर अग्नी फुलांनी बहरून आला.'गिर्मिट' संघटना,चळवळी, मोर्चे,हे सारं जीवाच्या आकांताने करणारा कार्यकर्ता धर्मा.उच्चविभूषित पण या भ्रष्ट व्यवस्थेत वशिला आणि पैशाशिवाय कुठचं चिकटत नाही.धर्माचा बाप मोंढ्यात काम करतो.आईच्या डोळ्यात सुखाचे स्वप्न तर बायकोच्या स्वप्नचा भुंगा झालेला.संघटनेचं राजकारण संपलं की, कार्येकर्ता भूकेकंगाल असं विदारक चित्रण या कथेचं आहे.डोक्याचं गिर्मिट नुसता धुमसत फिरण्यासाठी.धर्माचा फक्त वापर करून घेतला जातो.म्हणून आता कामा धंद्याचं पहा.अशी एक सृजनशील कथा.'संचारबंदी'आपल्या गावातील दुधवाल्या मुस्लिम पोरायला काल शहरात भोस्कलं.आता गावखेड्यातील ही मुसलमान घाबरले.कुठेतरी प्रार्थना स्थळावरुन जातीयवाद उसळला.अशा जातीय दंगलीमुळे गावातील अनेक मुस्लिम लोकं गाव सोडून जाऊ लागले.हुसेनची लेकरं गाव सोडून गेले.कथेतील अशोक म्हणतो "हुसेनमामू तुम्ही बिनधास्त राहा.भ्यायची काही गरज नाही.आणि तिकडं मळ्यात रहा.मी इथं आहे तो पर्यंत जेवन घेऊन जाईन, चला उठा!(पृ.119)हा माणुसकीचा गहिवर अजूनही आहे.'झळा'आजच्या माहेरवाशनीची कथा जावाई नोकरीला लागणार हाये म्हणून जरा पैशाचं टेकन द्या.इथं रांडमुंड सासूला पैसे मागणारा जावाई.पैसे दिले नाहीतर पोरगी वागवणार नाही.अशी धमकी देणारा.पण वठणीवर आणणारी सासू या कथेत आहे.'पाश' हा आजच्या काळाचा हा भंयकर विळखा म्हणजे रघू हा संस्थेत एक लाख रुपये व्याजनं काढून डोनेशन देतो.तो अंगावर रा◌ॅकेल टाकून जाळून घेतो.घाबरुन आप्पासाहेब त्याचे पैसे कपाटातून काढून देतो.त्याची ही विदारक कथा आहे.'जाणीव'या कथेत आईवडीलांना भानुदास एकुलता एक मुलगा.पुढे त्याला एक मुलगा त्याचं नाव अंकुश.बायको वारते.लोकं त्याची शेती संपत्ती पाहून दुसरं लग्न करून देतात.अंकुशला सावत्र आईचा छुपा त्रास सुरू होतो.शाळा सोडून शेळ्या वळायला पाठवणारी ही सावत्र माय.ही कोवळ्या मानाची घालमेल जाणीव या कथेतून आली आहे.बयनाम ही शिर्षक कथा अतिशय समर्पक समृद्ध आहे.या कथेतीलशांता, तिच्या नवऱ्याला पिसाळ कुत्रं डसतं.तो मरतो.शांता दोन लेकरं 'बापू आणि मुक्ता' यांना घेऊन धारदार निर्धाराने जगण्याचे ठरवते.मुलगा बापू भोळसर,तर लेक मुक्ता हिचं वावर विकून लग्न करते.वावर गहाणखत करुन देते.महादेव भावाने बहिणीचं शेत कोर्ट मॅटर लफड्यात खापी घातलं.पुढे भाळसर तोतरा बापू त्याची बायको यांचे कपटी डाव ओळखते व हानुन पाडते मामाला शेत विकण्यात आडकाठी अनते'ज्या बहिणीने आधार दिला.सक्या भावाचा बयनामा उघडं होतो.सून निघून जाते.जा मी तुला सुखी ठेवू शकत नाही बापूंच्या डोळ्यात अश्रू हे सांगत होते.माझ्या सोबत तुझ्या आयुष्याच वाळवण करुन घेऊ नको.जणू काही हेच त्याची नजर सांगत होती 'शेतात गेलेली शांता एक दिवस मरून पडली.मालक असलेला बापू दोन वेळच्या भाकरीसाठी मामाची खुलं राखत होता.मिसरुड फुटलेला बापू खाकी चड्डी अन् पांढरा मळकट सदरा घालून अनवाणी पायाने मामाचे गुरामागे फिरत होता"(पृ.151)अशी ही तत्कालीन जगण्याची सखेद कथा मनाला पिळवटून टाकते.ख्यातनाम साहित्यिक उध्दव कानडे यांची पाठराखण(ब्लर्ब)"दु:खाशी संवाद संवाद हाच या कथांचा प्राण आहे.मुकी माणसं बोलू लागतात तेंव्हा लेखकाची प्रतिभा त्यांना माणुसपणाचा चेहरा प्रदान करते.खेड्यातील माणसं सुंदर बोलतात.तेव्हा भाकरीची उपेक्षेची, गरीबीची कष्टाची लढाई सांगू लागतात.फाटलेलं जीवनाचं आकाश प्रेमाच्या सुईदोऱ्यांनी शिवतांना काळजातला जाळ पचवतात.माणसांच्या जीवंतपणाला भावपूर्णतेने समृद्ध करणाऱ्या या कथा महत्वाच्या आहेत.मराठी साहित्यात स्वत:ची एक वेगळी वाट या कथांनी निर्माण केली आहे."रवी मुकूल यांचे मुखपृष्ठ हे अतिशय सुंदर आशय संपन्न झाले आहे.आपल्या गाव शिवारात बालपण ते तरूणपण जे अस्सल अनुवभावातून आलं ते गावं माणसं त्या त्यांच्या जगण्याच्या व्यथा वेदनांचा आगडोंब त्याला चिंतन आशय तेने बा.बा.कोटंबे जी यांनी मांडले आहे.

**बयनामा:-बा.बा.कोटंबे**
प्रकाशक:-सुनीताराजे पवार,पुणे
संस्कृती प्रकाशन,पुणे
मुखपृष्ठ:-रवी मुकूल
किंमत:-250/रूपये



पुस्तक परिचय:-
**डॉ प्रभाकर शेळके, जालना**

जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ३० मे २०२६

# अहिल्यादेवी होळकर : समाजकल्याणाची दीपस्तंभ



भारतीय इतिहासात अनेक पराक्रमी राजे, दूरदृष्टी असलेले प्रशासक आणि लोकहितासाठी आयुष्य अर्पण करणाऱ्या व्यक्ती होऊन गेल्या; परंतु जनतेच्या मनावर मातृत्वाच्या भावनेने अधिराज्य गाजविणाऱ्या व्यक्तिमत्त्वांमध्ये लोकमाता अहिल्यादेवी होळकर यांचे स्थान अत्यंत मानाचे आहे. 31 मे हा दिवस त्यांच्या जयंतीदिनाच्या रूपाने संपूर्ण देशात आदराने साजरा केला जातो. मराठेशाहीच्या इतिहासात प्रशासन, न्याय, समाजकारण आणि लोककल्याण यांचा अद्भुत संगम घडवून आणणाऱ्या अहिल्यादेवी या केवळ एका संस्थानाच्या राणी नव्हत्या, तर त्या लोकांच्या सुखदुःखात सहभागी होणाऱ्या एक संवेदनशील माता होत्या. त्यांचे संपूर्ण जीवन हे कर्तव्य, त्याग, प्रामाणिकपणा आणि लोकसेवेचा आदर्श मानले जाते. त्यांच्या कार्याचा प्रभाव आजही समाजजीवनावर जाणवतो. स्त्रीशक्तीचे एक प्रभावी प्रतीक म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. समाजातील दुर्बल घटकांना आधार देत न्याय आणि सुशासनाचा आदर्श उभा करणाऱ्या अहिल्यादेवी होळकर यांचे व्यक्तिमत्त्व जितके प्रेरणादायी आहे तितकेच अभ्यासपूर्ण देखील आहे.अहिल्यादेवी होळकर यांचा जन्म 31 मे 1725 रोजी महाराष्ट्रातील अहिल्यानगर (अहमदनगर) जिल्ह्यातील चौंडी या गावी झाला. त्यांचे वडील माणकोजी शिंदे हे त्या गावचे पाटील होते. ग्रामीण वातावरणात वाढलेल्या अहिल्यादेवींना बालपणापासूनच संस्कार, कष्ट आणि समाजकल्याणाचे शिक्षण मिळाले. त्या काळात मुलींना शिक्षण देण्याची परंपरा फारशी नव्हती; परंतु माणकोजी शिंदे यांनी आपल्या कन्येला शिक्षण देण्याचा निर्णय घेतला. त्यातूनच अहिल्यादेवींच्या व्यक्तिमत्त्वात संवेदनशीलता, विचारशीलता आणि निर्णयक्षमता विकसित झाली. बालपणापासूनच त्यांना ग्रंथांचे वाचन, लोकांशी प्रेमाने वागणे आणि संकटात धैर्य राखणे यांचे संस्कार मिळाले होते. त्यांचे व्यक्तिमत्त्व साधेपणा आणि आत्मविश्वासाने परिपूर्ण होते.एक प्रसंग त्यांच्या आयुष्याला निर्णायक वळण देणारा ठरला. मराठा साम्राज्यातील पराक्रमी सरदार मल्हारराव होळकर हे पुण्याकडे जात असताना चौंडी येथे थांबले होते. त्या वेळी त्यांनी मंदिरात भक्तिभावाने पूजा करणाऱ्या अहिल्याबाईंचे दर्शन घेतले. त्यांच्या शांत, संयमी आणि तेजस्वी व्यक्तिमत्त्वाने प्रभावित होऊन मल्हाररावांनी आपला पुत्र खंडेराव होळकर यांच्याशी त्यांचा विवाह करण्याचा निर्णय घेतला. अल्पवयातच त्यांचा विवाह इंदूरच्या होळकर घराण्यात झाला आणि त्या होळकर घराण्याच्या सून बनल्या. विवाहानंतर त्यांनी केवळ राजघराण्याच्या परंपरा जपल्या नाहीत, तर प्रशासन आणि लोककल्याणाची जाणही आत्मसात केली.मल्हारराव होळकर हे पराक्रमी, दूरदृष्टी असलेले आणि अनुभवी प्रशासक होते. त्यांनी अहिल्यादेवींना राज्यकारभाराचे प्रशिक्षण दिले. युद्धनीती, न्यायदान, आर्थिक व्यवहार, प्रजेच्या अडचणी आणि प्रशासनातील बारकावे यांचे ज्ञान त्यांनी अहिल्यादेवींना दिले. त्या काळात स्त्रियांना राज्यकारभारात स्थान मिळणे दुर्मीळ होते; मात्र अहिल्यादेवींनी आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर हे आव्हान समर्थपणे स्वीकारले. त्यांना लोकांच्या समस्या समजून घेण्याची आणि त्यावर संवेदनशीलतेने उपाय करण्याची विलक्षण क्षमता होती.अहिल्यादेवींच्या आयुष्यात अनेक दुःखद प्रसंग आले. त्यांचे पती खंडेराव होळकर यांचा कुंभेरच्या युद्धात मृत्यू झाला. त्या वेळी सती जाण्याचा समाजाचा दबाव होता; परंतु मल्हारराव होळकर यांनी त्यांना सती जाण्यापासून रोखले. हा निर्णय भारतीय इतिहासात अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. कारण त्यातून एका महान राज्यकर्तीचा उदय झाला. पुढे मल्हारराव होळकर यांचे निधन झाले आणि काही काळानंतर त्यांच्या पुत्राचाही मृत्यू झाला. सततच्या वैयक्तिक दुःखांनी खचून न जाता अहिल्यादेवींनी धैर्याने राज्यकारभाराची सूत्रे हातात घेतली. एका स्त्रीने इतक्या प्रतिकूल परिस्थितीत नेतृत्व स्वीकारणे ही त्या काळात अत्यंत धाडसी बाब होती.अहिल्यादेवी होळकर यांनी इंदूर संस्थानाचा कारभार अत्यंत कुशलतेने चालविला. त्यांनी महेश्वर ही आपली राजधानी केली. नर्मदेच्या काठी वसलेले महेश्वर त्यांच्या कारकिर्दीत सांस्कृतिक आणि आर्थिक दृष्ट्या समृद्ध झाले. त्यांनी राज्यातील प्रशासनात पारदर्शकता आणि शिस्त आणली. त्यांच्या दरबारात न्यायदान अत्यंत निष्पक्षपणे केले जाई. गरीब असो किंवा श्रीमंत, सर्वांना समान न्याय मिळत असे. त्या स्वतः जनतेच्या तक्रारी ऐकत असत. लोकांच्या समस्या समजून घेऊन तत्काळ उपाययोजना करण्यावर त्यांचा भर होता. त्यांच्या प्रशासनात भ्रष्टाचाराला स्थान नव्हते.अहिल्यादेवींच्या राज्यकारभाराचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे लोककल्याणाची भावना. त्यांनी प्रजेच्या सुखाला सर्वोच्च प्राधान्य दिले. शेतकऱ्यांसाठी सिंचन व्यवस्था, विहिरी, तलाव आणि धरणांची उभारणी करण्यात आली. व्यापाऱ्यांना सुरक्षित वातावरण दिले गेले. व्यापार आणि उद्योगांना प्रोत्साहन दिल्यामुळे आर्थिक प्रगती झाली. महेश्वरी साड्यांच्या परंपरेला त्यांनी चालना दिली. आजही महेश्वरी साडी ही भारतीय वस्त्रसंस्कृतीचा अभिमान मानली जाते.अहिल्यादेवींनी महिलांच्या सन्मानासाठी आणि सुरक्षेसाठी अनेक निर्णय घेतले. स्त्रियांच्या समस्या समजून घेऊन त्यांना आधार देण्याचे कार्य त्यांनी केले. विधवा महिलांना समाजात सन्मानाने जगता यावे यासाठी त्यांनी प्रयत्न केले. स्त्रियांना मालमत्तेचे अधिकार मिळावेत, त्यांच्यावर अन्याय होऊ नये, यासाठी त्या जागरूक होत्या. स्त्री ही केवळ घरापुरती मर्यादित नसून समाजनिर्मितीत तिची महत्त्वाची भूमिका आहे, हा संदेश त्यांच्या जीवनातून दिसून येतो.अहिल्यादेवी होळकर यांची न्यायव्यवस्था अत्यंत प्रभावी होती. त्यांच्या दरबारात अन्यायाला मुळीच थारा नव्हता. त्या प्रत्येक प्रकरणाचा बारकाईने अभ्यास करून निर्णय घेत असत. लोकांना न्याय मिळावा यासाठी त्या कटिबद्ध होत्या. त्यांचा न्याय निष्पक्ष आणि मानवतावादी होता. त्यामुळे जनतेमध्ये त्यांच्याबद्दल अपार आदर निर्माण झाला. प्रजेच्या कल्याणासाठी त्यांनी प्रशासनातील अधिकाऱ्यांवर नियंत्रण ठेवले. चुकीचे वर्तन करणाऱ्यांना कठोर शिक्षा दिली जाई.अहिल्यादेवींच्या राज्यात शांतता आणि सुव्यवस्था होती. त्यांनी सैन्य व्यवस्था मजबूत ठेवली. शत्रूंचा सामना करण्यासाठी आवश्यक ते निर्णय घेतले. परंतु युद्धापेक्षा शांततेला आणि विकासाला त्यांनी अधिक महत्त्व दिले. त्यांच्या प्रशासनात आर्थिक शिस्त होती. राज्याच्या उत्पन्नाचा उपयोग लोककल्याणासाठी करण्यात येत असे. खर्चात काटकसर आणि जनहिताचा विचार हा त्यांच्या प्रशासनाचा पाया होता.अहिल्यादेवींच्या व्यक्तिमत्त्वात धार्मिकता होती; परंतु ती अंधश्रद्धेवर आधारित नव्हती. त्यांचा धर्म म्हणजे मानवसेवा होता. गरीब, गरजू आणि पीडित लोकांना मदत करणे हेच खरे धर्मकार्य आहे, असा त्यांचा दृष्टिकोन होता. त्यांनी अनेक दानधर्म केले. अन्नछत्रे चालवली. यात्रेकरू, साधू-संत आणि गरजू लोकांसाठी निवासव्यवस्था केली. त्यांचे जीवन अत्यंत साधे होते. राजसत्ता असूनही त्यांनी वैभवापेक्षा सेवेला महत्त्व दिले.त्यांच्या जीवनातील साधेपणा आजच्या काळातही प्रेरणादायी वाटतो. त्या राजवाड्यात राहत असल्या तरी त्यांच्या वागण्यात अहंकार नव्हता. त्या सामान्य लोकांशी प्रेमाने संवाद साधत असत. जनतेच्या दुःखात सहभागी होणे आणि त्यांच्या समस्या स्वतः समजून घेणे हे त्यांच्या स्वभावाचे वैशिष्ट्य होते. त्यामुळेच लोकांनी त्यांना 'लोकमाता' ही उपाधी दिली.अहिल्यादेवी होळकर यांनी शिक्षण आणि संस्कृतीच्या जतनासाठीही महत्त्वाचे योगदान दिले. त्यांनी विद्वान, कवी, पंडित आणि कलाकारांना आश्रय दिला. महेश्वर हे त्या काळात संस्कृती आणि साहित्याचे केंद्र बनले. सांस्कृतिक परंपरांचे जतन करण्याबरोबरच त्यांनी लोककलेलाही प्रोत्साहन दिले. समाजातील नैतिक मूल्ये टिकून राहावीत यासाठी त्यांनी प्रयत्न केले.भारतीय स्त्रीशक्तीचा विचार केला तर अहिल्यादेवींचे नाव अत्यंत आदराने घेतले जाते. त्यांनी संकटांना न घाबरता नेतृत्व स्वीकारले. वैयक्तिक दुःख बाजूला ठेवून जनतेच्या हितासाठी कार्य केले. त्यांचे जीवन हे संघर्षातून उभे राहिलेल्या यशाचे उदाहरण आहे. आजच्या महिलांसाठी त्यांचे कार्य प्रेरणादायी आहे. आत्मविश्वास, निर्णयक्षमता, कर्तव्यनिष्ठा आणि लोकसेवा या गुणांचा आदर्श त्यांच्या व्यक्तिमत्त्वातून दिसतो.आजच्या काळात प्रशासनात पारदर्शकता, न्याय आणि लोकाभिमुखता यांची आवश्यकता अधिक जाणवते. अशा वेळी अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य मार्गदर्शक ठरते. त्यांनी सत्ता ही जनसेवेचे साधन मानली. आज अनेक ठिकाणी भ्रष्टाचार, अन्याय आणि स्वार्थी राजकारण दिसून येते; परंतु अहिल्यादेवींच्या प्रशासनात प्रामाणिकपणा आणि नैतिकता सर्वोच्च होती. म्हणूनच त्यांच्या कार्याचा अभ्यास आजही प्रशासनशास्त्र आणि समाजकारणाच्या दृष्टीने महत्त्वाचा मानला जातो.अहिल्यादेवींच्या कार्यातून महिला सक्षमीकरणाचा प्रभावी संदेश मिळतो. त्या काळात स्त्रियांना अनेक सामाजिक बंधने होती; तरीही त्यांनी आपल्या कर्तृत्वाने इतिहासात अजरामर स्थान मिळविले. त्यांनी सिद्ध करून दाखवले की स्त्री सक्षम असेल तर ती राज्यकारभार, समाजकारण आणि नेतृत्व या सर्व क्षेत्रांत यशस्वी होऊ शकते. त्यांचे जीवन महिलांसाठी प्रेरणास्त्रोत आहे.भारतीय संस्कृती आणि परंपरेचे जतन करण्यात अहिल्यादेवींचे योगदान अनन्यसाधारण आहे. त्यांनी केवळ धार्मिक स्थळांचा जीर्णोद्धार केला नाही, तर सांस्कृतिक एकात्मतेलाही बळ दिले. उत्तर ते दक्षिण भारतातील अनेक तीर्थक्षेत्रांवर त्यांनी कामे केली. यामुळे देशाच्या सांस्कृतिक ऐक्याला चालना मिळाली. त्यांच्या कार्यातून राष्ट्रीय एकात्मतेची भावना दिसून येते.महेश्वर नगरीला त्यांनी दिलेली सांस्कृतिक ओळख आजही टिकून आहे. नर्मदेच्या घाटांवर उभे असलेले मंदिरसमूह, राजवाडे आणि वास्तू त्यांच्या दूरदृष्टीची साक्ष देतात. महेश्वरी वस्त्रोद्योगाला त्यांनी दिलेले प्रोत्साहन आजही हजारो कुटुंबांच्या उपजीविकेचे साधन आहे. स्थानिक उद्योगांना प्रोत्साहन देऊन आर्थिक स्वावलंबन वाढविण्याचा त्यांचा दृष्टिकोन अत्यंत प्रगत होता.अहिल्यादेवींच्या जीवनातील आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे संकटसमयी दाखवलेले धैर्य. सततच्या कौटुंबिक दुःखांनंतरही त्यांनी खचून न जाता जनतेच्या हितासाठी काम केले. वैयक्तिक दुःख बाजूला ठेवून कर्तव्याला प्राधान्य देणे ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची महानता होती. त्यांच्या जीवनातून आपल्याला संकटांवर मात करून पुढे जाण्याची प्रेरणा मिळते.त्यांच्या प्रशासनात धार्मिक सहिष्णुता होती. विविध समाजघटकांना त्यांनी समान वागणूक दिली. कोणत्याही धर्माविषयी द्वेषभावना न ठेवता सर्वांच्या श्रद्धेचा आदर केला. त्यांच्या या दृष्टिकोनामुळे समाजात सौहार्द आणि शांतता टिकून राहिली. आजच्या काळात सामाजिक सलोखा टिकविण्यासाठी त्यांच्या विचारांची गरज अधिक आहे.अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य केवळ इतिहासापुरते मर्यादित नाही. आजही त्यांच्या विचारांची आणि कार्यपद्धतीची उपयुक्तता जाणवते. चांगले प्रशासन कसे असावे, जनतेच्या गरजा कशा ओळखाव्यात, समाजातील दुर्बल घटकांना कसा आधार द्यावा आणि सत्ता लोककल्याणासाठी कशी वापरावी याचे आदर्श उदाहरण म्हणजे अहिल्यादेवी होळकर होत. म्हणूनच त्यांना भारतीय इतिहासातील सर्वोत्तम राज्यकर्त्यांपैकी एक मानले जाते.महाराष्ट्रासह संपूर्ण भारतात त्यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. विविध सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. त्यांच्या कार्याचा अभ्यास करून नवीन पिढीला प्रेरणा देण्याचा प्रयत्न केला जातो. अनेक ठिकाणी व्याख्याने, निबंध स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम आणि समाजोपयोगी उपक्रम राबवले जातात. ही जयंती केवळ स्मरणाचा दिवस नसून आदर्श जीवनमूल्यांचा विचार करण्याची संधी आहे.आजच्या समाजात नैतिक मूल्यांची घसरण, वाढती असमानता आणि स्वार्थी वृत्ती यांसारख्या समस्या दिसून येतात. अशा परिस्थितीत अहिल्यादेवींचे जीवन मार्गदर्शक ठरते. त्यांनी लोकसेवा, न्याय, प्रामाणिकपणा आणि मानवतेच्या मूल्यांना प्राधान्य दिले. त्यांच्या जीवनातून समाजासाठी कार्य करण्याची प्रेरणा मिळते.अहिल्यादेवी होळकर या भारतीय इतिहासातील एक तेजस्वी व्यक्तिमत्त्व आहेत. त्यांनी आपल्या कार्याने स्त्रीशक्तीचा नवा आदर्श निर्माण केला. लोककल्याणकारी प्रशासन, धार्मिक सहिष्णुता, न्यायप्रियता आणि सामाजिक बांधिलकी यांचा सुंदर संगम त्यांच्या व्यक्तिमत्त्वात दिसतो. त्या केवळ एका राज्याच्या राणी नव्हत्या, तर जनतेच्या हृदयातील लोकमाता होत्या. त्यांच्या कार्याचा वारसा आजही समाजाला प्रेरणा देत आहे.31 मे रोजी त्यांची जयंती साजरी करताना आपण त्यांच्या विचारांचे स्मरण करणे आवश्यक आहे. समाजातील दुर्बल घटकांना आधार देणे, न्याय आणि समानतेसाठी कार्य करणे, स्त्रीसन्मान जपणे आणि लोकहिताला प्राधान्य देणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल. अहिल्यादेवी होळकर यांचे जीवन हे भारतीय संस्कृतीतील सेवा, त्याग आणि मानवतेच्या महान परंपरेचे प्रतीक आहे. त्यांचा आदर्श प्रत्येक पिढीसाठी प्रेरणादायी राहील आणि लोककल्याणाच्या कार्यासाठी सदैव मार्गदर्शक ठरेल.



**डॉ. राजेंद्र बगाटे,**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
ईमेल – bagate.rajendra५@gmail.com